सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# उपनिबंधक सहकारी संस्था, पी विभाग, मुंबई

रुम नं. ३०३, तिसरा मजला अे विंग, बी. एम. सी. गोडावुन बिल्डिंग, संस्कृती कॉम्प्लेक्स जवळ, ठाकुर कॉम्प्लेक्स, ९० फुट रोड, कांदीवली (पुर्व) मुंबई ४०० १०१.

---

जा. क्र. मुंबई/उपनि/पी/का. क. ७३(सी)(अे)(i)(vii)सह/७८(अे)/
वसंत व्हॅली अस्टर टॉवर हौ./ १५१५ /२०२२
दिनांक :- २७ /०४/२०२२

## महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३(सी)(अे)(१)(vii)सह/७८(अे) अन्वये आदेश

वाचावे :- १. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३(सी) (अे) (१) (vii) सह / ७८(अे) खालील तरतुद.
२. या कार्यालयाचे कायदा कलम ७३(सी)(अे)(१)(vii)सह/७८(अे) खालील दि. २४/०२/२०२२ ची कारणे दाखवा नोटीस.
३. या कार्यालयात दिनांक १०/०३/२०२२ रोजी घेणेत आलेली सुनावणी.

ज्याअर्थी, **वसंत व्हॅली अस्टर टॉवर को-ऑप. हौ. सोसा. लि., सिटीएस नं. १५२-१५३ अे, अस्टर टॉवर, वसंत व्हॅली II, जनरल अरुणकुमार वैद्य मार्ग, फिल्मसिटी रोड, मालाड (पूर्व), मुंबई ४०० ०९७** ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ९ अन्वये नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्था आहे. आणि.,

ज्याअर्थी, सदर संस्थेचे दैनंदिन कामकाज हे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ संस्थेची नोंदणीकृत उपविधीतील तरतुदीनुसार व शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकानुसार चालविणे संस्थेस बंधनकारक आहे. आणि.,

ज्याअर्थी, श्री. विष्णू प्रकाश कनोडिया यांनी दिनांक ११/११/२०२१ अन्वये दिलेल्या तक्रारीनुसार या कार्यालयाने दिनांक २४/०२/२०२२ अन्वये कारणे दाखवा नोटीस देऊन या कार्यालयात दिनांक १०/०३/२०२२ रोजी सुनावणी दिलेली होती. सुनावणी वेळी जाबदेणार यांनी सचिव श्री. दिपक सराफ हे हजर होते व इतर जाब देणार समिती सदस्य श्री. संजय अगरवाल हे गैरहजर होते. जाब देणार श्री. दिपक सराफ यांनी दिनांक १०/०३/२०२२ रोजीच्या सुनावणी वेळी दिनांक ९/०३/२०२२ रोजीच्या पत्रान्वये त्यांचे लेखी म्हणणे दाखल केले आहे. सोबत त्यांच्या मुलांची आधारकार्ड प्रत जोडण्यांत आली असून, श्री. दिपक सराफ यांना खालीलप्रमाणे ०३ मुले आहेत. तसेच श्री. संजय अगरवाल यांनी त्यांचे सबब कारणे दाखवा नोटीसीमध्ये नमूद केलेला मुद्दा व खुलासा येणेप्रमाणे आहे आणि,

**मुद्दा :- संस्थेचे सचिव - श्री. दिपक सराफ यांना खालीलप्रमाणे ०३ मुले आहेत.**

| अ. क्र. | मुलांची नावे | मुलांची जन्मतारीख / वर्षे |
|---|---|---|
| १ | कु. रिया दिपक सराफ | १९९९-२२ वर्ष |
| २ | कु. प्रियंका दिपक सराफ | १९९६-२५ वर्ष |
| ३ | कु. सार्थक दिपक सराफ | २००४- १८ वर्ष |

सबब महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ मधील तरतूदीनुसार ज्या समिती सदस्यास २००१ नंतर ०१ मुले आहेत अशी व्यक्ती समितीवर समिती सदस्य म्हणून राहू शकत नाही. त्यामुळे कायदा कलम ७३(सी)(अे)(१)(vii) मधील तरतूदीनुसार संस्थेचे सचिव - श्री. दिपक सराफ यांना तिन मुले असल्याने तसेच सन २००१ नंतर ०१ अपत्य असल्याने ते समितीवर सचिव म्हणून रहाण्यास निरर्ह होऊ शकतात.

**<u>खुलासा</u>** :- संस्थेचे सचिव - श्री. दिपक सराफ यांनी दिनांक १०/०३/२०२२ रोजीच्या सुनावणी वेळी दिनांक ९/०३/२०२२ रोजीच्या पत्रान्वये त्यांचे लेखी म्हणणे दाखल केले आहे. सोबत त्यांच्या मुलांची आधारकार्ड प्रत जोडण्यांत आली आहे.

**मुद्दा :- संस्थेचे व्यवस्थापक समिती सदस्य - श्री. संजय अगरवाल यांना खालीलप्रमाणे ०३ मुले आहेत.**

| अ. क्र. | मुलांची नावे | मुलांची जन्मतारीख / वर्षे |
|---|---|---|
| १ | कु. सुची संजय अगरवाल | ९/०५/१९९१-३० वर्ष |
| [illegible] | कु. सौरभ संजय अगरवाल | २२/०३/१९९३-२८ वर्ष |
| ३ | कु. सखी संजय अगरवाल | १९९७-२४ वर्ष |

उपनिबंधक, सहकारी संस्था, पी-विभाग, मुंबई
DY REGISTER CO-OPERATIVE SOCIETIES P WARD MUMBAI

सबब महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ मधील तरतूदीनुसार ज्या समिती सदस्यास २००१ नंतर ०१ मुले आहेत अशी व्यक्ती समितीवर समिती सदस्य म्हणून राहू शकत नाही. त्यामुळे कायदा कलम ७३(सी)(अे)(७) मधील तरतूदीनुसार संस्थेचे व्यवस्थापक समिती सदस्य - श्री. संजय अगरवाल यांना सन २००१ नंतर एकही अपत्य नाही. सदरहु कारणास्तव ते समितीवर व्यवस्थापक समिती सदस्य म्हणून रहाण्यास पात्र ठरु शकतात.

**<u>खुलासा</u>** :- संस्थेचे व्यवस्थापक समिती सदस्य - श्री. संजय अगरवाल हे सुनावणीवेळी गैरहजर असून, या कार्यालयात श्री. दिपक सराफ यांनी दिनांक १०/०३/२०२२ रोजीच्या सुनावणी वेळी दिनांक ९/०३/२०२२ रोजीच्या पत्रान्वये त्यांचे लेखी म्हणणे दाखल केले आहे. सोबत त्यांनी श्री. संजय अगरवाल यांच्या मुलांची आधारकार्ड प्रत जोडून दिलेली आहे.

ज्याअर्थी, मुंबई डिस्ट्रीक को-ऑप. हौ. फेडरेशन लि., मुंबई या संघीय संस्थेकडून अभिप्राय मागविला असता दिनांक २/०३/२०२२ रोजीचा या कार्यालयास दिनांक १०/०३/२०२२ रोजी संघीय संस्थेचे पत्र प्राप्त झाले असून, त्यांनी सदरबाबत कोणताही अभिप्राय दिलेला नाही.

वरील परिस्थिती विचारात घेता संस्थेचे सचिव - श्री. दिपक सराफ यांना दोन पेक्षा अधिक म्हणजेच तिन मुले असल्याने ते समितीवर सचिव म्हणून रहाण्यास अपात्र ठरत आहेत. सबब त्यांना महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३(सी)(अे)(१)(vii)सह/७८(अे)(१)(ब) अन्वये समिती सदस्य म्हणून रहाण्यास अपात्र करणे आवश्यक आहे अशी माझी खात्री झालेली असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## -: आदेश :-

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३(सी) (अे) (१) (vii) सह/७८ (अे)(१)(ब) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये मी प्रतिक पोखरकर, उपनिबंधक सहकारी संस्था पी विभाग, मुंबई आदेश देत आहेत की, **वसंत व्हॅली अस्टर टॉवर को-ऑप. हौ. सोसा. लि., सिटीएस नं. १५२-१५३ अे, अस्टर टॉवर, वसंत व्हॅली II, जनरल अरुणकुमार वैद्य मार्ग, फिल्मसिटी रोड, मालाड (पूर्व), मुंबई ४०० ०९७** चे श्री. दिपक सराफ यांना समिती सदस्य म्हणून उर्वरित कालावधीसाठी रहाण्यास यांना अपात्र करत आहे.

सदरचा आदेश दिनांक २७/०४/२०२२ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी देत आहे.

उपनिबंधक, सहकारी संस्था, पी-विभाग, मुंबई DY REGISTER CO-OPERATIVE SOCIETIES P WARD MUMBAI

(प्रतिक पोखरकर)
उपनिबंधक,
सहकारी संस्था पी विभाग, मुंबई

**प्रत :-**

१. श्री. दिपक सराफ - सचिव, सदनिका क्र. बी १३०१,
वसंत व्हॅली अस्टर टॉवर को-ऑप. हौ. सोसा. लि., सीटीएस नं १५२, १५३ अे, वसंत व्हॅली II, जनरल अरुणकुमार वैद्य मार्ग, फिल्मसिटी रोड, मालाड (पूर्व), मुंबई ४०० ०९७.

२. श्री. संजय व्ही. अगरवाल - व्यवस्थापक समिती सदस्य, सदनिका क्र. बी ११०३,
वसंत व्हॅली अस्टर टॉवर को-ऑप. हौ. सोसा. लि., सीटीएस नं १५२, १५३ अे, वसंत व्हॅली II, जनरल अरुणकुमार वैद्य मार्ग, फिल्मसिटी रोड, मालाड (पूर्व), मुंबई ४०० ०९७

३. चेअरमन/सेक्रेटरी, वसंत व्हॅली अस्टर टॉवर को-ऑप. हौ. सोसा. लि., सीटीएस नं १५२, १५३ अे, वसंत व्हॅली II, जनरल अरुणकुमार वैद्य मार्ग, फिल्मसिटी रोड, मालाड (पूर्व), मुंबई ४०० ०९७.

४. मा. व्यवस्थापक, मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., मालाड, मुंबई.

५. मा. व्यवस्थापक, महाराष्ट्र सहकारी बँक लि., मालाड, मुंबई.

उपनिबंधक
सहकारी संस्था पी विभाग मुंबई